**Q.P. Code:00003423**

[वेळ: **३ तास**] [ **गुण:१००** ]

**कृपया तुम्हाला योग्य प्रश्नपत्रिका मिळाली आहे का ते तपासा.**

**सूचना: १. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहेत.**
**२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत.**
**३. प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.**

**प्र.१** **अ)**'वाटेवरच्या सावल्या' या लेखात कुसुमाग्रज यांनी लहानपणीच्या कोणत्या आठवणी सांगितल्या आहेत? **२०**

**किंवा**

**ब)**'संगमनेरचे दिवस' दया पवार यांच्या या लेखात भारतीय जातिव्यवस्थेच्या दोषांचीजाणीव होते, हे स्पष्ट करा.

**प्र.२** **अ)**शांता शेळके यांच्या 'पन्नासपैकी शून्य मार्क्' या विधानाचा आशय स्पष्ट करा. **२०**

**किंवा**

**ब)**वाय. सी. पवार यांनी 'जडणघडण' या लेखात आयुष्यातील कोणत्या आठवणी मांडलेल्या आहेत?

**प्र.३** **पुढीलपैकी कोणत्याही दोन टिपा लिहा.** **१०**

**१.**सुशीलकुमार शिंदे

**२.**दुसऱ्यावेळी वेळी पास झालो- महात्मा गांधी

**३.**चंद्रशेखर धर्माधिकारी

**४.**सरगम- सी. रामचंद्र

**प्र.४** **कोणताही एक प्रश्न सोडवा.** **१०**

**अ) १.**वृत्तात्मक इतिवृत्ताचे उद्देश व लेखन पद्धती स्पष्ट करा.

**किंवा**

**२.** वारणा दुध संस्था, ता. कागल, जि. कोल्हापूर या दूध संस्थाची वार्षिक सभा संपन्न झाली या सभेचा वृत्तात्मक इतिवृत्त लिहा.

**ब)१.**अहवालात्मक इतिवृत्त म्हणजे काय? या अहवालात्मक इतिवृत्ताचे स्वरूप सांगा.

**किंवा**

**२.** 'लिज्जत पापड'चे उत्पादन करणाऱ्या कंपनीने मागणी वाढावी यासाठी अहवालात्मक इतिवृत्त लिहा.

**Q.P. Code:00003423**

**प्र.५** **अ)** जाहिरात म्हणजे काय? जाहिरातीचा मसुदा तयार करण्याचे महत्वाचे घटक सांगा. **१०**

**किंवा**

**ब)** लहान मुलांच्या कपड्यांच्या दुकानाची जाहिरात करा.

**प्र.६** **पुढील उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **१०**

दृश्यांचे चित्रीकरण करताना दिग्दर्शकाला अनेक अडचणी तोंड द्यावे लागले.समस्या अशी होती की त्याने निवडलेले ठिकाण एखाद्या शहरापासून खेड्यापासून फार दूर होते. नजर पोहोचेल तिथवर केवळ वाळू आणि मध्येमध्ये काटेरी झुडपे व वाळलेले गवत. वाळवंटा मधून रेल्वेचा मार्ग असा गेला होता की त्याला ना आदी ना अंत. चित्रीकरण जैसलमेर मध्ये होते. आणि कामावरचा लोकांना सगळे सामान त्या निवडलेल्या जागी घेऊन यावे लागले होते. आगगाडीच्या दिशेने धावणाऱ्या उंटाना पकडण्यासाठी कॅमेरामनना उघड्या जीपमध्ये शिरावे लागले होते. त्याकरिता चित्रीकरणासाठी त्या जागेवर कॅमेरा आणून त्यासाठी जवळच एक खोदलेला रस्ता असणे आवश्यक होते. त्यानंतर ची गोष्ट म्हणजे एक आगगाडी मिळवने. अचानक कोळशाचे भाव वाढले आणि ते ज्या आगगाडीचा उपयोग करणार होते ती एका दिवसाच्या सूचनेने रद्द करण्यात आली.

**प्रश्न :**

**१. चित्रपटाचे चित्रीकरण कोठे होणार होते?**
**२. आजूबाजूला सर्वत्र काटेरी झुडपे का होती?**
**३. उघड्या जीपची गरज कशासाठी होती?**
**४. दृश्याचे चित्रीकरण होऊ शकणार नाही असे दिग्दर्शकाला का वाटले?**
**५. आगगाडी का रद्द करण्यात आली होती?**

**प्र.७** **खालील उताऱ्याचे सारांशलेखन करा.** **१०**

भाषा ही मानवाची विशेष निर्मिती आहे. मानवी व्यवहाराचे प्रभावी माध्यम आहे. तसेच ते एक ज्ञान संपादनाचे व अभिव्यक्तीचे प्रभावी साधन आहे. एका शतकाकडून दुसऱ्या शतकाकडे वाटचाल करताना भाषा ही नेहमी भूतकाळाला सोबत घेऊन वर्तमानाला आपल्यात सामावून घेत, भविष्याकडे वाटचाल करीत असते. भाषा आणि सांस्कृतिक वारसा यांचे जैविक नाते असते. सांस्कृतिक वारशाचे जतन आणि पुढच्या पिढीकडे संक्रमण भाषेद्वारा होत असते. नवे संबोध, नव्या संज्ञा, नव्या कल्पना, नवे विचार यांच्याद्वारे सांस्कृतिक वारशात पडणारी भर भाषेला समृध्द करत असते हे सारे मुख्यतः साहित्याच्या माध्यमातून होत असते म्हणूनच प्राथमिक स्तरापासूनमुलांच्या वयाशी सुसंगत अशा साहित्याचा समावेश अभ्यासक्रमात केला जातोत्या साहित्यामुळे विद्यार्थ्याचे भावनिक जीवन संतुलित बनते, वैचारिक समृद्धता येते आणि भाषिक कौशल्य सहज साध्य होतात.

4A91CAE847BB9EFAB1065B0ED6656D1E

**Q.P. Code:00003423**

**प्र.८ पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंधलेखन करा.** **१०**

१. शेतकऱ्यांच्या आत्महत्या

२. निसर्ग आणि मानव

३. प्लास्टिक मुक्त भारत

४. प्रदूषण एक समस्या